भारतीय वन सेवेतील २०१७ च्या बॅचच्या अधिकाऱ्याकरिता कनिष्ठ समय वेतनश्रेणीतील सहाय्यक वनसंरक्षकाचे एक अधिसंख्य पद निर्माण करण्याबाबत......

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग,

शासन निर्णय क्र.आयएफएस-१५१९/प्रक्र. ७४/फ-७अ

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई.४०००३२.

दि. २७ मे, २०१९.

वाचा :-

१) केंद्र शासनाच्या पर्यावरण,वने व जलवायु परिवर्तन मंत्रालयाचे आदेश क्र. १७०१६/०१/२०१९-आयएफएस- १, दि. २१.०५.२०१९,

२) वित्त विभाग, शासन निर्णय, क्र.पदनि-२०१२/प्र.क्र.६६/१२/वित्तीय सुधारणा-१, दि.११.७.२०१२.

३) वित्त विभाग, शासन निर्णय, क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.७/१६/वित्तीय सुधारणा-१, दि.२०.२.२०१६.

४) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.आयएफएस-१५१९/प्रक्र. ७४/फ-७अ, दि. ०९.०४.२०१९

शासन निर्णय :-

भारतीय वन सेवेतील सन २०१७ च्या तुकडी मधील महाराष्ट्र संवर्गातील अधिका-यांकरीता संदर्भाधीन दि. ०९/०४/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये दि.१ मे, २०१९ ते ३० एप्रिल, २०२१ या कालावधीसाठी सहाय्यक वनसंरक्षकांची ११ अधिसंख्य पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

त्याचप्रमाणे केंद्र शासनाच्या पर्यावरण,वने व जलवायु परिवर्तन मंत्रालयाच्या संदर्भाधिन दि. २१/०५/२०१९ रोजीच्या आदेशान्वये सन २०१७ च्या तुकडीतील श्रीमती आदिती भारद्वाज, भावसे यांना ओरीसा संवर्गातून महाराष्ट्र संवर्गात वैवाहिक कारणास्तव बदली करण्याबाबत परवानगी देण्यात आली असल्याने दि.२७ मे, २०१९ ते ३० एप्रिल, २०२१ या कालावधीसाठी खालील प्रमाणे सहाय्यक वनसंरक्षकाचे आणखी ०१ पद निर्माण करण्यात येत आहे.

अ. क्र.	अधिकाऱ्याचे नाव	वनवृत्ताचे नाव	वन विभाग
१.	श्रीमती आदिती भारद्वाज, भावसे	नागपूर	नागपूर

उक्त अधिकाऱ्याकरिता दि. २७ मे, २०१९ ते ३० एप्रिल, २०२१ या कालावधीकरिताचा सदर पदावरील वेतन व भत्यापोटी येणारा खर्च प्रधानशिर्ष " मुख्य लेखाशिर्ष २४०६-वनीकरण व वन्यजीवन (योजनेत्तर), १०१ वनसंधारण व विकास, १०१ (०१) प्रशासन व संरक्षण (२४०६ ००९६) ०१-वेतन " या लेखाशिर्षाखाली उपलब्ध असलेल्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय हा वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.पदनि-२०१२/प्र.क्र.६६/१२/ वित्तीय सुधारणा-१, दि.११ जुलै, २०१२ व शासन निर्णय क्रमांक पदनि-२०१६/प्र.क्र.७/१६/वित्तीय सुधारणा-१, दि.२० फेब्रुवारी, २०१६ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०५२८१२५३४२१०१९ असा आहे. हा आदेश डीजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VIRENDRA RAMBAHAL TIWARI

Digitally signed by VIRENDRA RAMBAHAL TIWARI
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=a95e1a9759002ee190cd79464daaba7dc840ec375cd62a646a64986631086810, postalCode=400032, street=R AND F D,4TH FLOOR,MANTRALAYA,MUMBAI, ou=FOREST DEPARTMENT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=VIRENDRA RAMBAHAL TIWARI
Date: 2019.05.28 13:02:49 +05'30'

(वीरेंद्र तिवारी)
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)

प्रत,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२. संचालक, इंदिरा गांधी राष्ट्रीय वन अकादमी, डेहराडून.
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संशोधन, शिक्षण व प्रशिक्षण), पुणे.
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
५. मुख्य वनसंरक्षक (शिक्षण व प्रशिक्षण), पुणे.
६. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर.
७. उप वनसंरक्षक, नागपूर.
८. संबंधित परिविक्षाधीन भावसे अधिकारी.
९. महालेखापाल (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता)-२, नागपूर.
१०.कोषागार अधिकारी, नागपूर
११.सहायक संचालक, भावसे (लेखा) कक्ष, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२.अवर सचिव (फ-७), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३.निवड नस्ती, फ-७अ, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.